प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद,वाशिम

विषय :- वाशिम जिल्हा परिषदच्या न्यायालयीन प्रकरणाकरीता वकील पॅनल नियुक्ती बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने खालील प्रमाणे माझी वैयक्तीक माहिती सादर करण्यात येत आहे. त्यानुसार माझे अर्जाचा विचार करण्यात यावा हि विनंती.

१) अर्जदाराचे पुर्ण नांव (आडनांव प्रथम) (मराठी व इंग्रजी) :-

२) संपुर्ण पत्ता (दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र. इत्यांदीसह व ई-मेल I.D.) :-

३) अर्जदारांची जन्मतारीख तसेच दि.३१-१२-२०१८ रोजी असणारे वय(वर्ष महीने आणि दिवस) :-

४)अर्जदाची शैक्षणिक पात्रता :-

५) अर्जदाराने विधी पदवी प्राप्त केलेल्या मान्यताप्राप्त विद्यापिठाचे/संस्थेचे नांव :-

६) विधी पदवी प्राप्त केल्याची तारीख :-

७)ॲडव्होकेट म्हणुन ज्या मान्यता प्राप्त संस्थेचा नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला आहे त्या संस्थेचे नांव (बार कौन्सिल)नोंदणी क्रमांक आणि दिनांक :-

८) प्राप्त झालेला नोंदणी क्रमांक अजूनही कार्यान्वीत आहे काय. :-

९)उच्च न्यायालयात/जिल्हा न्यायालयात ॲडव्होकेट म्हणुन अर्जाचे दिवशी झालेली प्रॅक्टीस :-

१०) इतर तपशिल :-

सदर्हु नियुक्तीसाठी लागु असलेल्या आपल्या सर्व अटी व शर्तीची मला जाणीव असुन या मला मान्य आहेत.(त्या सोबत स्विकृतीसह जोडलेल्या आहेत.)

अर्जदाराची स्वाक्षरी व पुर्ण नांव

ठिकाण :-

दिनांक :-

(ॲड.--------------------------------)



Scanned by CamScanner

**कार्यालय जिल्हा परिषद,वाशिम**
**वाशिम जिल्हा परिषदेची न्यायप्रविष्ठ प्रकरणे चालविण्याकरिता वकीलासाठी**
**शर्ती (अटी) व बंधने**

१) ज्या वकीलांना जिल्हा परिषद वाशिमने नियुक्ती दिली असेल त्या नियुक्ती दिल्याच्या आदेशाचे दिनांकापासून वाशिम जिल्हा परिषदेच्या विरुद्ध असलेले कोणतेही न्यायालयीन प्रकरण / दावा स्विकारता येणार नाही.

२) न्यायप्रविष्ट जिल्हा परिषद वाशिम तर्फे प्राप्त झालेली सर्व माहिती संबंधित वकीलांनी त्यांच्यापर्यंतच गोपनिय ठेवावी. या माहितीचा उपयोग संबंधित दाव्याच्या प्रकरणात न्यायालयातच जिल्हा परिषदच्या वतीने करावा. जिल्हा परिषद वाशिमचे संमतीशिवाय या माहितीचा उपयोग त्यांना इतरत्र करता येणार नाही.

३) जिल्हा परिषद पॅनलवरिल असलेल्या वकीलांपैकी न्यायालयीन प्रकरणे द्यावयाचे बाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांना राहतील.

४) वाशिम जिल्हा परिषदचे नियुक्त वकील म्हणून खालील प्रमाणे मानधनासाठी ते पात्र राहतील. हे मानधन व दर्शविलेला सादिल / किरकोळ खर्च याव्यतिरिक्त इतर कोणताही जादा खर्च मंजुर केला जाणार नाही.

अ) वाशिम येथिल किंवा इतरत्र न्यायालयातील किंवा वरिष्ठ कार्यालय व इतर न्यायपिठातील मुळ दाव्यासाठी प्रतिदावा रु.४०००/- मानधन व या दाव्याकरिता सादिल तथा प्रकरणाबाबत अनुषांगिक

Scanned by CamScanner

(क) उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र प्रशासकिय दाव्याच्या प्रकरणी प्रतिदावा रु.७०००/- मानधन व या दाव्याकरिता सादिल तथा प्रकरणाबाबत आवश्यक अनुषांगिक किरकोळ खर्चासाठी रु.३०००/- जास्तीत जास्त रक्कम मंजुर केली जाईल.

(ड) कोणत्याही प्रकरणात नियमानुसार कायदेशिर लेखी सल्ला देण्याचे शुल्क एकावेळी एका प्रकरणामध्ये जास्तीत जास्त रु.२००/- दिल्या जाईल.

(इ) वकील नोटीसचे उत्तर देण्यास वकील फी व त्या अनुषांगिक किरकोळ खर्च एकूण रु.२००/- जास्तीत जास्त दिल्या जाईल.

(फ) उच्च न्यायालय व इतर न्यायालय तसेच इतर न्यायपिठातील प्रकरणात बिफ ड्राफ्ट करिता जास्तीत जास्त रु.२००/- पर्यंत खर्च मंजुर केल्या जाईल.

५) वाशिम मुख्यालयीन बाहेरचे न्यायालयीन प्रकरणी दाव्याच्या प्रत्येक सुनावणीवर हजर राहण्यासाठी रेल्वेचे वर्ग १ चे भाडे व जिल्हा परिषदेच्या वर्ग १ च्या अधिकारी यांना देय असलेला एक दिवसाचा भत्ता याप्रमाणे आकारता येईल यापेक्षा जास्त रक्कम मान्य केल्या जाणार नाही. सदर प्रवासभत्याची मागणी संबंधित दाव्याचे खातेप्रमुख यांच्याकडे महिन्यातून फक्त एक वेळा याप्रमाणे पाठवता येईल.

६) एकाच तारखेला एकाच मुख्यालयीन एकापेक्षा जास्त प्रकरणे कार्यवाहीत असल्यास दैनिक भत्ता व प्रवासभाडे फक्त एका प्रकरणातच एकदाच अनुज्ञेय राहील.

७) कोणत्याही दाव्याच्या प्रकरणामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये खर्चासाठी अग्रीम रक्कम मिळणार नाही मानधन व सादिल / किरकोळ खर्चाची रक्कम संबंधित दाव्याच्या अंतीम न्यायनिर्णयानंतर संबंधित खातेप्रमुख यांचेकडून दिल्या जाईल.



Scanned by CamScanner

८)		प्रत्येक खर्चाबाबत त्याची पावती/प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक राहील अशी पावती पडताळणी करतांना त्यास मंजूरी देणे किंवा नाकारणे किंवा दुरुस्ती करुन मंजूरी देणे याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना राहतील.

९)		न्यायप्रविष्ठ प्रकरणी अतिरिक्त वकीलांची नियुक्ती करणे किंवा प्रकरण कार्यवाहीत असतांना अन्य दुस-या वकीलास चालविण्यास देणें किंवा प्रकरण सहमतीने आपसी करारानुसार अंतिम निकाली काढण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना राहतील.

१०)		कोणत्याही दाव्याच्या प्रकरणी कोणत्याही टप्प्यावर वकीलांना नियुक्ती देण्याचा किंवा काढण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

११)		रुपये १००/- चे बंधपत्रावर या शर्ती ,अटी व बंधनाबाबत करारनामा करुन दिल्यानंतर व नियुक्तीचा आदेश झाल्यानंतर,नियुक्तीचा कालावधी हा वाशिम जिल्हा परिषदेच्या पुढील निर्णय व आदेशापर्यत सुरु राहील.

१२)		वकालतनामा करुन दिल्यानंतर व सर्व सबंधित माहिती,नस्ती तसेच आवश्यक दस्ताऐवज वकीलांचे ताब्यात दिल्यानंतर त्याबाबतची पोच लिखीत स्वरुपात सबंधित खाते प्रमुख यांना द्यावी व नंतर सबंधित अधिकारी/कर्मचारी यांना शक्यतो वकिलांनी त्यांच्या कार्यालयात किंवा न्यायालयात बोलावू नये.

१३)		वकीलांनी अधिक आवश्यक असलेली माहिती,कागदपत्रे बाबत सबंधित विभाग/शाखेस पत्र देवून किंवा प्रत्यक्ष संपर्क करुन उपलब्ध करुन घ्यावी. याबाबत काहीही अडचण आल्यास सबंधित कार्यालय प्रमुखांना लिखीत स्वंरुपात पत्र देवून किंवा प्रत्यक्ष भेटून कळविण्यात यावे.

१४)		जी न्यायप्रविष्ठ प्रकरणे ज्या वकीलांना चालविण्यास दिली असेल अशा प्रकरणी नियमानुसार कार्यालयीन बाबीची पूर्तता करण्यास कायदेविषयक



Scanned by CamScanner

लेखी सल्ला देणे त्यांना बंधनकारक राहील याबाबत वेगळी वकील फी दिली जाणार नाही.

१५) सोपविलेल्या न्यायप्रविष्ठ दाव्यांचा अहवाल दरमहा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना पाठवावा. तसेच दावा न्यायालयात प्रलंबित न राहता न्यायनिर्णय लवकर होईल या दृष्टीने न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा सुरु ठेवावा लागेल.

१६) न्यायालयीन प्रकरणाबाबतच्या स्थितीसंदर्भात आवश्यक ती माहिती संबंधित विभागाचे खातेप्रमुख यांना वेळोवेळी देणे बंधनकारक राहील.

१७)न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबत अहवाल व माहिती संबंधित कार्यालयाने मागितल्याचे पत्र प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आत देण्यात यावे तसेच प्रकरणाच्या तारखांची माहिती संबंधित कार्यालयास वेळोवेळी देण्यांत यावी. अपवादात्मक स्थिती वगळता आवश्यकतेपेक्षा अधिक (तिनपेक्षा जास्त वेळ) तारखा घेऊ नये. प्रकरण अंतीम निकाली निघाल्यास निकालाचे प्रतीसह लिखीत अभिप्राय व प्रकरणी पुढील कार्यवाहीचे विधीमत नोंदवून देण्यात यावे.

१८)नेमणूक केलेल्या वकीलाकडे कार्यालयाने दिलेली प्रकरणे कोणतेही सबब सांगून परत करता येणार नाही आणि अपरिहार्य कारणास्तव अपवादात्मक स्थितीत प्रकरण परत करावयाचे असल्यास लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. दोन न्यायप्रविष्ट प्रकरणे लागोपाठ हरल्यास, वारंवार न्यायालयात गैरहजर राहिल्यास,प्रकरणाची माहिती कार्यालयास वेळोवेळी न दिल्यास कामकाज असमाधानकारक वाटल्यास कोणत्याही सुचना किंवा लेखी पत्र न देता पॅनलमधून नाव कमी करण्याचे संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,वाशिम यांना राहतील अशा प्रकारे कोणत्याही कारणाने पॅनलमधून कमी केलेल्या वकीलाकडून त्यांच्याकडे असलेली न्यायप्रविष्ट प्रकरणे संपुर्ण माहिती व कागदपत्रे/नस्ती पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आत संबंधित विभाग/शाखा यांचेकडे परत करण्यात यावी अन्यथा संबंधितांविरुद्ध बार कॉन्सील वकील



Scanned by CamScanner

पंजीकरण विभाग न्यायालय किंवा अन्य विभागात या विषयीची तक्रार नोंदवून आवश्यक सर्व उपाय करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहिल

१९) वरिल अनुक्रमांक ४ मधील अ ते ड या मध्ये जेथे मानधन असा उल्लेख आलेला आहे ती मानधनाची रक्कम संपुर्ण दाव्यासाठी एकत्रित रक्कम असून ती दाव्याचे अंतीम न्यायनिर्णयानंतरच अदा करण्यात येईल.

२०) वरिल सर्व शर्ती, अटी व बंधने ही वाशिम जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या वकीलांना बंधनकारक राहतील.

२१)करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे संपुर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. वरिलप्रमाणे अटी व शर्तीसह जिल्हा परिषद वाशिम व ॲडव्होकेट यांनी मान्य केला असून त्यानुसार काम करण्याचे स्विकृत केलेले आहे. या करारनाम्यानुसार आज दिनांक ------------------------- रोजी स्वाक्षरी करित आहोत.

30/01/19

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

Scanned by CamScanner